M.I.D.C Police Station, Jalgaon,Dist.Jalgaon, Maharashtra
एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता.जि.जळगांव महाराष्ट्र
Ph. No.02557- 2210500. Email ID- pstn.midc@gmail.com.

**प्रेसनोट**

एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन
दिनांक १७/०७/२०२६

प्रति,

मा.संपादक

--------------------------------

विषय - विनापरवाना गावठी कट्टा बाळगुन दहशत माजविण्याच्या उद्देशाने फिरणारा ईसम एमआयडीसी पोस्टे जळगाव कडुन जेरबंद.सुमारे १,२२,०००/- रु. किमतीचा मुद्देमाल हस्तगत.

----ooo----

जळगाव शहरातील अयोध्यानगर परिसरात एक ईसम गावठी कट्टा अशा घातक हत्यारांसह दहशत माजविण्याच्या उद्देशाने फिरत असले बाबतची गोपनिय बातमी सफौ विजयसिंग पाटील यांना दि.१५/०७/२०२६ रोजी प्राप्त झाली. सदर गोपनीय बातमीच्या अनुषंगाने पोनि बबन आव्हाड यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोस्टे चे गुन्हे शोध पथकाचे पोउनि चंद्रकांत धनके, सफौ विजयसिंग पाटील, पोहेकॉ किरण चौधरी, पोहेकॉ प्रमोद लाडवंजारी, पोहेकॉ गिरीश पाटील, पोना प्रदीप चौधरी, पोकॉ विशाल कोळी, पोकॉ सुभाष साबळे, पोकॉ योगेश घुगे अशांचे पथक नेमुण सदर पथकास योग्य त्या सुचना देवुन कारवाई करणे बाबत आदेशित केले.

वर नमुद गुन्हे शोध पथकान तात्काळ जळगाव शहरातील अयोध्यानगर, जळगाव ते भुसावळ महामार्ग भागात गोपनिय माहिति काढून शोध घेत असतांना महामार्गालगत अयोध्या नगर ते गौरव हॉटेलकडे जाणा-या सर्विस रोडवर एक मोटार सायकलवर ईसम येतांना दिसले असता सदर पथकाने शिताफीने सदर वाहन थांबवुन वाहन चालकास विचारपुस करुन त्यांच्या अंगझडती मध्ये कमरेला एक गावठी बनावटीचा कट्टा व २ जिवंत काडतुस मिळुन आल्याने सदर संशयित ईसमांस पंचासमक्ष नाव गाव विचारता **अभिषेक संजय हवलदार, वय 23 वर्षे, धंदा मजुरी, रा.हल्ली मु.50 नंबर शाळेजवळ अशोक किराणा जवळ रामेश्वंर कॉलनी जळगाव, कायमचा पत्ता - वडार गल्ली, बुधवार पेठ सोलापुर जि.सोलापुर** असे सांगितले. सदर ईसमांना ताब्यात घेवुन एमआयडीसी पोलीस स्टेशन सिसिटीएनएस क्रं.६०६/२०२६, भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३/२५,मु.पो.का.क. ३७ (१)(३), चे उल्लघन १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर ईसम यांच्याकडून हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालीलप्रमाणे,

१) **२०,०००/- रुपये किमतीचे एक गावठी बनावटीचे कट्टा कि.अं.जु.वा.**

२) **२,०००/- रुपये किमतीचे दोन जिवंत काडतुस कि.अं.जु.वा.**

३) **१,००,०००/- रुपये किमतीचे बजाज चेतक इलेक्ट्रीक मोपेडे वाहन कि.अं.जु.वा.**

--------------------------------

**एकुण - १,२२,००००/-**

सदर आरोपीतांस अटक करुन मा. न्यायालयात हजर केला असता त्यांना पोलीस कस्टडी देण्यात आली आहे. सदर गुन्हाचा पुढील तपास पोना प्रदीप चौधरी करत आहे.

सदरची कारवाई मा. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.श्री संदीप गावीत अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.श्री नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जळगाव भाग, श्री बबन आव्हाड, पोलीस निरीक्षक एमआयडीसी पोस्टे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

**( बबन आव्हाड )**
**पोलीस निरीक्षक**
**एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव**


फोन नं. 0257 - 2210500 / 2210163
SMART POLICING
एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जळगाव